मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,
भाईंदर (प.), ता.जि. ठाणे, 401 101.
दुरध्वनी क्र. 28192828/28193087.

जा.क्र.मनपा/आस्था/ 1569 /2024-25 **दि. 26/ 08 /2024**

परिपत्रक

विषय :- आपले सरकार व पी.जी. पोर्टलवरील तक्रारींचे निराकरण करणेबाबत

संदर्भ :- शासन परिपत्रक क्रमांक :-संकीर्ण/1522/प्र.क्र.178/लो.दि.क., दि.18 सप्टेंबर 2023

राज्यातील नागरीकांसाठी ऑनलाईन पध्दतीने तक्रार दाखल करता यावी तसेच प्रशासनाने ऑनलाईन पध्दतीने अशा तक्रारींचे निवारण करावे यासाठी "आपले सरकार व पी.जी पोर्टल" ही तक्रार निवारण प्रणाली शासनाने कार्यान्वित केलेली आहे.

त्यानुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आपले सरकार पोर्टलवर विविध विभागात नागरीकांकडून विविध प्रकारच्या तक्रारी प्राप्त होत असतात. सदर प्राप्त तक्रारी अर्जावर 21 कार्यालयीन दिवसांत कार्यवाही करुन कार्यवाहीचा अहवाल तक्रारदार यांना कळविणेबाबत संदर्भिय शासन निर्णयामध्ये नमुद आहे.

तरी सर्व विभागप्रमुख/खातेप्रमुख यांनी सुचित करण्यात येते की, आपले सरकार, पी.जी.पोर्टलवर प्राप्त होणाऱ्या तक्रारीचे वेळावेळी निराकरण करण्यात यावे.

26/8/2024

(संजय दोंदे)
उप-आयुक्त (मुख्यालय)
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रति,
सर्व विभाग प्रमुख/खाते प्रमुख
/- सर्व विभागप्रमुख/खातेप्रमुख यांनी आपल्या अधिनस्त असलेल्या सर्व (वर्ग-1 ते वर्ग-3) अधिकारी/कर्मचारी यांच्या निर्देशनास आणुन दयावे.